# आजच्या अंतराळयुगातील काही अंधश्रद्धा

माझा हा नेहमीचा अनुभव आहे. मी एखादे व्याख्यान दिले आणि त्यानंतर अध्यक्षांनी श्रोतृवर्गाकडून प्रश्न मागवले, तर हे तीन प्रश्न त्यात हटकून असतात.... मग व्याख्यानाचा विषय काहीही असो. १) बर्म्युडा त्रिकोणात नक्की कोणती शक्ती काम करते आहे? २) उडत्या तबकड्यांच्या बातम्यांत कितपत तथ्य आहे? ३) ग्रहांचा आपल्या जीवनावर परिणाम होतो का? लक्षणीय गोष्ट ही, की हे प्रश्न भारतीय उपखंडातच विचारले जातात, असा माझा वैयक्तिक अनुभव आहे.

यापैकी तिसऱ्या प्रश्नाची सविस्तर चर्चा मी या लेखामालेत आणि इतरत्र व्याख्यानात, वादविवादात केली आहे. माझे उत्तर नकारात्मक आहे, ते का व कसे हे पुराव्यानिशी सांगूनसुद्धा ज्याला ते उत्तर होकारात्मक हवे असते तो आपले मत बदलत नाही. यावरून ही अंधश्रद्धा भारतीय जनमानसात किती खोलवर रुजलेली आहे, याची जाणीव होते. इथे अंधश्रद्धा हा शब्द मी अशा विश्वासांबाबत वापरतो ज्यांना वैज्ञानिक चाचणीत उतरेल, असा कसलाही आधार नसतो.

पहिले दोन प्रश्न विचारणाऱ्यांची सामान्यपणे अशी धारणा असते, की बर्म्युडा त्रिकोणात असे काही अद्भुत घडते आहे, की त्यामागे परकीय, म्हणजे पृथ्वीबाहेरची, जीवसृष्टी काम करते आहे. तसेच उडत्या तबकड्या म्हणजे परकीय जीवसृष्टीतून आलेली अंतराळ याने असा त्यांचा समज असतो. ही मानसिकतादेखील अंधश्रद्धेचा भाग आहे. फरक इतकाच, की फलज्योतिषावरची अंधश्रद्धा पारंपरिक आहे, तर पहिल्या दोन अंधश्रद्धा आधुनिक काळातल्या आहेत. अंतराळतंत्रज्ञानाची सुरवात झाल्यावर त्यांचा उगम झाला; परंतु त्यामागची वस्तुस्थिती अशी आहे.

बर्म्युडा त्रिकोण हा फ्लोरिडा, पोर्टो रिको आणि बर्म्युडा यांना जोडून तयार होतो. अटलांटिक महासागराच्या या भागात विमाने पडण्याच्या, हरवण्याच्या, नावा बुडण्याच्या, घड्याळे बंद पडण्याच्या अशा पुष्कळ विचित्र घटना घडतात, अशा वर्णनांची पुस्तके १९७५-७७ च्या सुमारास प्रसिद्ध होऊ लागली. त्यातील रोचक आणि भडक वर्णनांनी जनमानसाची निश्चितच पकड घेतली. त्यात

## 'रहस्य' बर्म्युडा त्रिकोणाचे!

■ बर्म्युडा त्रिकोणाबाबतच्या गोष्टी अतिरंजित आणि कपोलकल्पितही

■ या भागात विमान गायब होण्यात अनाकलनीय असे काही नव्हते

■ त्यामुळे अशा गोष्टींवर विश्वास ठेवणे म्हणजे अंधश्रद्धेचेच एक उदाहरण

चार्ल्स बर्लिट्झचे 'बर्म्युडा ट्रायांगल' हे पुस्तक सर्वांत आघाडीवर होते; परंतु या पुस्तकांत कथन केलेल्या कथा खरोखर घडल्या का? पुस्तकांतील हकिगती आणि वास्तविक काय घडले याचा सखोल अभ्यास करून ॲरिझोनातील एक ग्रंथपाल लॉरेंझ कुश याने एक पुस्तक लिहिले. त्यावरून असे दिसते, की मूळ कथा अतिरंजित तर होत्याच; पण काही ठिकाणी कल्पितच होत्या. आपण एक उदाहरण पाहू या, जे पुष्कळदा या त्रिकोणातील अनाकलनीयतेचे उदाहरण म्हणून दिले जाते.



'फ्लाइट १९' या नावाने ओळखली जाणारी ५ लढाऊ विमानांची टोळी ५ डिसेंबर १९४५ या दिवशी १४ वैमानिक घेऊन दुपारी बाहेर पडली. फोर्ट लॉडरडेल, फ्लोरिडा येथील हवा, ती विमाने निघाली तेव्हा चांगली होती; पण त्यांच्या नियोजित परतीच्या वेळेच्या १५ मिनिटे पूर्वी त्या वैमानिकांचा नायक लेफ्टनंट चार्लस टेलरचा एक धास्तावलेला संदेश कंट्रोल टॉवरकडे आला, "आम्हाला कळत नाही आम्ही कुठे आहोत.. इथे सगळेच अनोळखी, विचित्र दिसतंय... पश्चिम दिशा कोणीकडे आहे माहीत नाही..." हा संदेश आल्यावर एक मॅरिनर विमान १३ लोकांसह त्यांना मदत करायला धाडले गेले; पण तेही नाहीसे झाले आणि ६ विमाने अधिक २७ वैमानिक यांचा पुढे काही पत्ता लागला नाही. बर्लिझच्या एका वर्णनात असाही उल्लेख आहे, की टेलरने मध्येच एक संदेश पाठवला "माझ्या मागे येऊ नका... असे दिसते की ते लोक बाहेरच्या अंतराळातून आलेत."

हे वर्णन वाचून, तेही रसभरीत भाषेत केलेले, वाचकाचा ग्रह असाच होतो, की 'फ्लाइट १९' आणि तिला मदत करायला गेलेले मॅरिनर विमान परकीय हल्ल्यात दगावले; पण वास्तविकता काय होती?

प्रथम हे सांगायला हवे, की ती विमाने दुपारी ४.२५ ला चांगल्या हवेत दगावली नाहीत. संध्याकाळी ७ नंतरसुद्धा ती आकाशात होती आणि त्या वेळी हवा वादळी झाली होती आणि अंधार पडला होता. टेलर वगळता इतर वैमानिक शिकाऊ होते. नौदलाने केलेल्या चौकशीत असे



**जयंत नारळीकर**

आढळून आले, की खुद्द टेलर रस्ता चुकला आणि जमिनीपासून लांब जात राहिला. १९४५ मध्ये रडार यंत्रणा फार समृद्ध नव्हती. त्यामुळे त्याला योग्य दिशादर्शन न होऊन ती पाचही विमाने पाण्यात पडून बुडाली. मॅरिनर विमानातील पेट्रोलची टाकी फारशी सुरक्षित नव्हती. ते विमान रडार पडद्यावरून नाहीसे झाले तेव्हाच एका बोटीवरच्या यात्रेकरूंना आकाशात एका विमानाचा स्फोट होताना दिसला होता. तेव्हा या विमानाच्या गायब होण्यामागे अनाकलनीय असे काही नव्हते. आणि टेलरचा संदेश? वास्तविक लॉगबुकमध्ये त्या संदेशाची नोंद अशी आहे : "मी कुठे आहे, मला आता माहीत आहे. मी २३०० फुटांवर आहे. माझ्यामागे येऊ नका." म्हणजे वास्तविक संदेश आणि बर्लिट्झच्या हकिगतीत कसा 'घ' चा 'मा' केलाय ते पहा!

बर्म्युडा त्रिकोणाबाबत असा दावा केला जातो, की या भूभागात नाहीशी होणारी विमाने व बोटी संख्येने पृथ्वीवरील इतर ठिकाणांहून पुष्कळ जास्त आहेत. बर्म्युडा त्रिकोणाचा गवगवा झाल्यावर शास्त्रज्ञांनी अमेरिकन कोस्टगार्डचे रेकॉर्ड तपासले. दर वर्षी किती नावा कुठे हरवल्या याच्या नोंदी काय सांगतात? तर त्रिकोणात नाहीशा झालेल्या नावांचे प्रमाण सरासरीपेक्षा जास्त नाही. विमानांच्या बाबतीत तर असे दिसून येते, की त्रिकोणात पडलेली किंवा हरवली असलेली विमाने सरासरीपेक्षा कमीच होती. म्हणजे त्रिकोणाचा समुद्री भाग घातक न म्हणता सुरक्षितच म्हटला पाहिजे. त्याचप्रमाणे या भागात चुंबकीय क्षेत्र विचित्रपणे काम करते, या विधानालादेखील कसलाही शास्त्रीय आधार नाही.

आणखी एक घटना ईस्टर्न एअरलाइन्सच्या विमानाबद्दल सांगितली जाते, ती अशी. मायामीकडे येणारे हे विमान रडारवरून अदृश्य झाले. सर्व तत्काळ सेवांची विमानतळावर सिद्धता होते न होते तो ते विमान दहा मिनिटांनी परत रडारवर आले आणि सुरक्षितपणे उतरले. प्रवासी व क्रू यांना काही विचित्रच घडल्याची कल्पना नव्हती; पण त्या सर्वांची घड्याळे दहा मिनिटे मागे होती! प्रत्यक्ष चाचणीत असे दिसून आले, की एअरपोर्टवरील आणि ईस्टर्न एअरलाइन्सच्या प्रत्यक्ष नोंदीत अशी घटना घडल्याचे कुठेच लिहिलेले नाही. एअरलाइन्सचे म्हणणे, की जर असे काही घडले असते तर आम्हाला ते कळल्याशिवाय राहील कसे? आणि एअरपोर्टवरील नेहमीच्या नोंदीत इतकी खळबळजनक घटना उल्लेखाशिवाय कशी राहील? थोडक्यात, कुशने ५० घटनांचा सखोल अभ्यास केला, ज्या बर्म्युडा त्रिकोणातल्या महत्त्वाच्या घटना मानल्या जातात. त्याला विश्वसनीय अशी एकही त्यात सापडली नाही. बहुतेक घटना अतिरंजित, चुकीच्या पुराव्यावर आधारित किंवा कपोलकल्पित होत्या. अशा घटनांवर विश्वास ठेवणे हे अंधश्रद्धेचेच एक उदाहरण नव्हे का? काही वर्षांपूर्वी मी पोर्टो रिकोला जाऊन आलो. तिथे कोणी बर्म्युडा त्रिकोणाबद्दल बोलत नव्हते. मी तिथल्या एका रेडिओशास्त्रज्ञांना विचारले, "तुम्ही बर्म्युडा त्रिकोणात राहता, तुम्हाला काही विशेष अनुभव आले का?" ते हसले आणि उत्तरले, "त्यामुळे या जागेला तात्पुरती प्रसिद्धी मिळाली खरी! पण आता आम्ही ते केव्हाच विसरून गेलो." मला वाटते अंधश्रद्धा जोपासण्यासाठी भारतासारखा दुसरा देश सापडणार नाही. इतर देशांनी टाकून दिलेल्या अंधश्रद्धा इथे खतपाणी घालून वाढवल्या जातात.

दूरदर्शनवर कार्यक्रम असतो. "यांना आपण पाहिलेत का?" नाहीशी झालेली माणसे शोधण्यासाठी. अशा व्यक्तींची माहिती थोडक्यात दिलेली असते. आता महाराष्ट्रातही इतकी माणसे अदृश्य होतात, त्या अर्थी त्यांना पळवून नेणारे परग्रहावरचे अज्ञात जीव या राज्यात आहेत असे समजायचे का?

(लेखक ज्येष्ठ शास्त्रज्ञ आहेत.)


**उद्याच्या अंकात**

**ऐतिहासिक चुकीचे परिमार्जन**

भारताच्या आण्विक कार्यक्रमाची वाटचाल रोखण्याच्या ऐतिहासिक चुकीचे परिमार्जन अमेरिकेने नागरी अणुकरार करून केले आहे.. **पल्लव बागला यांचा लेख**